# प्रश्न सोडवणार की मुंबईची बदनामीच करणार?

## नितेश राणेंचा मुख्यमंत्र्यांना सवाल



**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी):** काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पावसाळ्याच्या अनुषंगाने मुंबईत पुन्हा एकदा नालेसफाई आणि इतर मान्सूनपूर्व कामांची चर्चा सुरू झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईतील नालेसफाई आणि पाणी तुंबण्याच्या घटनांवर लक्ष वेधत भाजपचे आमदार नितेश राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर सोमवारी निशाणा साधला आहे. समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ 'शेअर' करत नितेश राणे यांनी, ''नालेसफाई आणि इतर प्रश्न सोडवणार की मुंबईला तुंबई बनवून मुंबईची जगभरात बदनामी करणार,'' असा सवाल मुख्यमंत्र्यांना केला आहे. तसेच, या प्रकरणी मुख्यमंत्र्यांना आ. नितेश राणे यांनी पत्रही पाठवले आहे.

**जनतेच्या मूळ समस्येकडेही लक्ष देणे आवश्यक**

आ. नितेश राणे म्हणाले की, ''पावसाळ्यात मुंबईची तुंबई होते. अशीच मुंबईची ओळख सातत्याने प्रसारमाध्यमे देतात. परंतु, या तुंबलेल्या मुंबईत अनेकांनी आपले हकनाक जीव गमावले, तरीही त्यावर ठोस उपाययोजना म्हणून मुंबई महापालिकेत दीर्घकाळ सत्ता भोगणारी शिवसेना मात्र, काहीही करू शकलेली नाही. मुंबईला नुसती ठेकेदारांच्या फायद्यासाठी रंगरंगोटी आणि देखावा करून गतवैभव प्राप्त होणार नाही. त्यासाठी जनतेच्या मूळ समस्येकडेही लक्ष दिले पाहिजे. यावर्षी चांगला पाऊस होण्याच्या शक्यता वर्तवल्या जात आहेत. त्यामुळे पावसाळ्यात मुंबईची काय परिस्थिती असेल, याची कल्पना करवत नाही. तुंबणाऱ्या या मुंबईत ३८६ अशी धोक्याची ठिकाणे आहेत, ज्याला 'फ्लडिंग पॉईंट्स' म्हटले हाते. त्यापैकी २८ ठिकाणे एकाच 'पश्चिम' विभागातील आहेत. फक्त माटुंगा, वडाळा, शीव भागातच यातील २५ 'फ्लडिंग पॉईंट्स' आहेत. यंदाच्या पावसाळ्यात समुद्राला २२ दिवस भरती असण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. त्यामुळे मुंबईत सलग २५० मिलीपेक्षा अधिक पाऊस पडला, तर मुंबईला २६ जुलैच्या परिस्थितीची आठवण येईल की काय,'' अशी भीती आ. नितेश राणे यांनी व्यक्त केली आहे.

उपाययोजनांच्या संदर्भात बोलताना आ. राणे म्हणाले की, ''पावसाच्या पाण्याचा निचरा या 'फ्लडिंग पॉईंट्स'मधून झाला नाही, तर मुंबईकरांना भीषण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. या 'फ्लडिंग पॉईंट्स' येथे पाण्याचा उपसा करण्यासाठी पंप लावण्यापलीकडे आपण काय उपाययोजना केल्या आहेत, हे आम्हा जनतेस कळले पाहिजे. राज्य सरकार व मुंबई महापालिका प्रशासन या संवेदनशील मुद्द्यावर विविध विभागांचे मत लक्षात घेता काही धोरणे आखणार आहेत का, तेथील नागरिकांना अशा संभाव्य आपत्तिजन्य परिस्थितीविषयक उपाययोजनांविषयी आपण काही जनजागृती केली आहे का, या सर्व प्रश्नांची सोडवणूक आपण करणार आहात की नेहमीप्रमाणे मुंबईला तुंबई म्हणून देश व जागतिक स्तरावर बदनाम करणार आहात,'' असा सवाल आ. नितेश राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना विचारला आहे.

नेवासा येथील मुलीच्या अपहरणाचा मुद्दा पेटणार!

# दोषींवर कारवाई करा, अन्यथा आंदोलन

## आ.गोपीचंद पडळकर यांचा गृहमंत्र्यांना इशारा



**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी):** ''अहमदनगर जिल्ह्याच्या नेवासा तालुक्यातील अंतरवली गावातून धनगर समाजातील एका मुलीचे अपहरण करण्यात आले. त्याबाबत पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या मुलीच्या पालकांना शिवीगाळ करत त्यांच्याकडून लाखो रुपये वसूल करण्यात आले आहेत. तेव्हा संबंधितांवर कारवाई करा, अन्यथा मला आंदोलन करावे लागेल,'' असा इशारा भाजपचे नेते आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांना दिला आहे. गोपीचंद पडळकर यांनी नुकताच समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ पोस्ट करत आपली या संदर्भातील भूमिका स्पष्ट केली. तसेच, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करत पीडित मुलीला सुखरूप आपल्या पालकांकडे सुपूर्द करण्याची विनंतीही पडळकर यांनी केली आहे.

**तक्रारदारांवर पोलिसांची दमदाटी**

''धनगर समाजातील अपहृत मुलीच्या अपहरणानंतर तिच्या आई-वडिलांनी शुक्रवार, दि. ६ मे रोजी पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली. मात्र, पोलीस निरीक्षक असलेल्या बाजीराव पवार यांनी घटनेची चौकशी करण्यासाठी आलेल्या मुलीच्या आई-वडिलांना अश्लील शिवीगाळ आणि दमदाटी केली. त्यासोबतच संबंधितांकडून तब्बल १ लाख, २५ हजार रुपये वसूल केले. सदर बाब जिल्हा पोलीस निरीक्षकांच्या कानी घातल्यानंतर तक्रारदारांचा जबाब नोंदवण्यात आला आहे. या प्रकारावरून तक्रारदारांवर पोलिसांनी कशाप्रकारे दमदाटी केली हे उघड झाले आहे,''असे आ. पडळकर म्हणाले.

**...त्यास सरकारच जबाबदार राहील**

''तत्काळ संबंधित 'पीआय'ला निलंबित करून गृहमंत्र्यांनी मुलीला सुखरूप आई-वडिलांकडे सुपूर्द करण्याच्या कारवाईसाठी आदेश द्यावेत. मला आंदोलन करण्यास भाग पाडू नका. सरकारच्या नाकर्तेपणामुळे पुढे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली तर त्यास सरकारच जबाबदार राहील,'' असा इशाराही पडळकरांनी यावेळी दिला.



▶ **मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुंबादेवी भाग संघचालक दिनेश गडा यांची दै. 'मुंबई तरुण भारत'चे 'एक्झिक्युटिव्ह-स्पेस सेलिंग' रवींद्र जाधव यांनी आर्थर रोड येथील त्यांच्या घरी नुकतीच भेट घेतली. यावेळी रवींद्र जाधव यांनी दिनेश गडा यांना दै. 'मुंबई तरुण भारत' प्रकाशित 'कालजयी सावरकर' हे पुस्तक भेट स्वरुपात दिले. याप्रसंगी दै. 'मुंबई तरुण भारत'चे वितरण प्रतिनिधी शशिकांत दळवी उपस्थित होते.

## थोडक्यात

### 'बुद्धांकुर मित्र मंडळा'तर्फे बुद्ध जयंती साजरी



**मुंबई** : 'बुद्धांकुर मित्र मंडळा'ने बुद्धवंदना करून आणि परिसरातील नागरिकांना मिठाई वितरण करत बुद्ध जयंती साजरी केली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष दीपक अहिरे, मदनमोहन कुशवाहा, गौतम साळवे, प्रभात गुप्ता, महादेव माने, अंकुश बनसोडे, मिठाई लाल आणि अफसर भाई उपस्थित होते.

### पशू व दुग्धविकास प्रश्नांबाबत अभ्यास गटाची स्थापना



**मुंबई** : सेंद्रिय व विषमुक्त दूधनिर्मिती टप्प्यातील प्रश्नांबाबत सविस्तर अभ्यास गट स्थापन करण्याची घोषणा करून अहवाल शासनाला तत्काळ दाखल करण्याची सूचना पशुसंवर्धन व दूग्ध विकासमंत्री सुनील केदार यांनी दिली आहे. 'महा ऑरगनिक ॲण्ड रेसिड्यू फ्री फार्मर्स असोशिएशन'च्या (मोर्फा) पदाधिकाऱ्यांची नुकतीच मंत्रालयात पशुसवंर्धन व दुग्धविकासमंत्री सुनील केदार यांच्या समवेत सेंद्रिय व विषमुक्त प्रश्नांबाबत बैठक पार पडली. यावेळी सुनील केदार यांनी वरील निर्देश दिले. यावेळी 'मोर्फा'चे अध्यक्ष कृषिभूषण अंकुश पडवळे, पशुसंर्धन विभागाचे सहसंचालक माणिक गुट्टे, कृषी विभागाचे उपसचिव ह. गो. म्हपणकर, दुग्धविकास विभागाच्या शामबाला दबडे, पशुसंर्धन उपायुक्त डॉ. शैलेश केंडे, दुग्धविकास अधिकारी एस. आर. शिरपूरकर, डॉ. रवींद्र सावंत, 'मोर्फा'चे संजय देशमुख, अमरजित जगताप, कैलास जाधव, डॉ. किशोर मठपती, डॉ. सोमनाथ माने, आरे कॉलनीचे रवींद्र पवार उपस्थित होते.

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त पुरस्कार वितरण समारंभ

**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी):** स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारका'च्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे शौर्य, विज्ञान आणि स्मृतिचिन्ह पुरस्कार तसेच, 'शिखर सावरकर पुरस्कार २०२१'चा वितरण समारंभ रविवार, दि. २२ मे रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित केला आहे. यावेळी स्मारकाने तयार केलेला 'समाजक्रांतिकारक सावरकर' या लघुपटाचे लोकार्पणही करण्यात येणार आहे. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राच्या विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार अतुल भातखळकर उपस्थित राहणार आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, वीर सावरकर मार्ग, छत्रपति शिवाजी महाराज उद्यान, दादर (प.) मुंबई-२८ येथे हा समारंभ होणार आहे. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्यावतीने देण्यात येणारा 'शौर्य पुरस्कार' 'कीर्तिचक्र' विजेते नायब सुभेदार संतोष राळे यांना, तर 'विज्ञान पुरस्कार' 'डीआरडीओ'चे संचालक अतुल राणे आणि स्मृतिचिन्ह पुरस्कार बडोदरा येथील 'वीर सावरकर स्मृती केंद्र' यांना प्रदान करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे कोरोनामुळे प्रलंबित झालेला 'शिखर सावरकर पुरस्कार २०२१' हादेखील यावेळी देण्यात येणार आहे. या पुरस्कराच्या अंतर्गत 'शिखर सावरकर जीवनगौरव पुरस्कार', एव्हरेस्टवीर पद्मश्री सोनम वांग्याल, 'शिखर सावरकर युवा पुरस्कार' सुशांत अणवेकर, मुंबई यांना, तर 'शिखर सावरकर उत्कृष्ट गिर्यारोहण संस्था पुरस्कार' 'रत्नदुर्ग माऊंटेनिअर्स, रत्नागिरी' यांना प्रदान करण्यात येईल. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष प्रवीण दीक्षित, कार्याध्यक्ष रणजित सावरकर, कोषाध्यक्षा मंजिरी मराठे, कार्यवाह राजेंद्र वराडकर आणि सहकार्यवाह स्वप्नील सावरकर यांनी या संबंधात ही माहिती दिली.

**उजाळा रत्नागिरी पर्वाला...**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी रत्नागिरीमध्ये स्थानबद्ध झाल्यानंतर तेथे समाज सुधारणेचे एक अतिशय मोलाचे आणि सर्व देशाला ही अनुसरण करण्यास वाटावे, असे प्रातिनिधिक दृष्टीनेही महत्त्वपूर्ण दिशादर्शक काम केले. जे समाजक्रांतीचेच होते. अशा या समाजक्रांतिकारक सावरकरांना आणि त्यांच्या कार्याला लोकांसमोर मांडणारा लघुपट स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाने तयार केला आहे. त्या लघुपटाचे या समारंभात लोकार्पण करण्यात येणार आहे. हिंदू धर्मातील त्या सात बेड्यांना तोडून आणि ज्यांना मंदिर प्रवेशही निषिद्ध केला, अशा समाजातील आपल्या बंधूंना पतितपावन मंदिरात प्रवेश देणे, सहभोजनातून आपण सारे हिंदू बंधू-बंधू आहोत, ही जाणीव करून देत सावरकरांनी साधलेल्या त्यावेळच्या समाजक्रांतीला नव्या पिढीपुढे मांडणारा हा लघुपट आहे.

# अतुल शाह म्हणजे हिरा; त्यांचे कार्य प्रेरणादायी : ॲड. आशिष शेलार

## लसीकरण वर्षपूर्तीनिमित्त अतुल शाहंचा सत्कार

**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी):** ''भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार की, त्यांच्यामुळे आज देशाने कोरोनावर यशस्वीरीत्या मात केली आहे. इतर देशांना लस देऊन मदत त्यांनी मदत केली. त्याचीच प्रेरणा घेऊन आम्हीसुद्धा त्या दिशेने प्रवास सुरू केला. या संपूर्ण कार्यात माजी आमदार आणि माजी नगरसेवक अतुल शाह यांनी घेतलेला सक्रिय सहभाग नोंदणीय आहे. कोरोनापासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी लसीकरणाचा यज्ञ सुरू केला. लसीकरण मोहिमेत त्यांनी घेतलेली मेहनत, दिवसरात्र एक करून मुंबईतील नागरिकांची केलेली सेवा मी पाहिली आहे. खऱ्या अर्थाने अतुल शाह एक हिरा आहेत, त्यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांच्या या कामातून मलादेखील प्रेरणा मिळाली आहे,'' असे गौरवोद्गार भाजपचे आमदार ॲड. आशिष शेलार यांनी काढले आहेत. महाराष्ट्र भाजपचे प्रवक्ते आणि माजी आमदार, नगरसेवक अतुल शाह संचालित सी. पी. टँक रोड परिसराच्या 'माधवबाग' येथील लसीकरण केंद्राच्या वर्षपूर्तीनिमित्त अतुल




शाह यांच्या सत्कार समारोहाच्या कार्यक्रमात ते सोमवारी बोलत होते. माधवबाग येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माधवबागेत आयोजित करण्यात आलेल्या 'सत्कार समारोह' कार्यक्रमाला भाजप नेते आणि आमदार ॲड. आशिष शेलार, माजी आमदार राज के. पुरोहित, माजी आमदार आणि माजी नगरसेवक अतुल शाह यांच्यासह भाजपच्या विविध पदाधिकाऱ्यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माधवबाग लसीकरण केंद्राने नुकतेच एक वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केले असून अतुल शाह यांच्या मार्गदर्शनाखाली ४८ हजार नागरिकांच्या लसीकरणाचा उच्चांक गाठला आहे. त्यानिमित्त अतुल शाह यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारोह आयोजित करण्यात आला होता.

**अतुल शाहंचा इतिहास अमर होणार!**

यावेळी बोलताना माजी आमदार आणि भाजप नेते राज के. पुरोहित म्हणाले की, ''नि:स्वार्थ रुग्णसेवेचा इतिहास हा अतुल शाह यांनी घडविला आहे. कोरोना काळात प्रत्येक मुंबईकरांच्या मदतीसाठी ते कायम अग्रेसर राहिले होते आणि आजही आहेत. कोरोना आपत्तीच्या काळात ते कायमच रुग्णांसाठी आधारस्तंभ होते. अशा प्रकारचे कार्य केल्यामुळे अतुल शाह यांचा सन्मान झालाच पाहिजे. कारण, ते सन्मानासाठी पात्र आहेत. कोणत्याही प्रकारचा काळाबाजार न करता, कोणाचाही हक्क न मारता त्यांनी हे यश प्राप्त केले आहे. ज्यावेळी लोक घरातून बाहेर पडायला घाबरत होते, त्यावेळेस अतुल शाह आणि त्यांचे कर्मचारी सेवेत मग्न होते. कर्मचाऱ्यांनीसुद्धा दिवसाची रात्र करून हे यश मिळवले, याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. नि:स्वार्थ आणि निरपेक्ष भावनेने केलेल्या अतुल शाहंच्या कार्याचा इतिहास अमर होणार,'' असे राज पुरोहित यावेळी म्हणाले.

# कुछ शर्म बाकी हो तो माफी मांगे उद्धव ठाकरे

**संजय पांडेय यांचा टोला**



**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी):** ''मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल यांनी त्यांच्या पुस्तकात पंतप्रधानांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख केला आहे. तसेच, पुस्तक प्रकाशनाच्या वेळीही महापालिका आयुक्तांनी या गोष्टीची आठवण करून दिली की, जेव्हा त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'रेमडेसिवीर' इंजेक्शनच्या पुरवठ्याच्या संदर्भात 'ई-मेल' केला, तेव्हा त्यावर रात्री १.३० वाजता पंतप्रधानांकडून त्यावर उत्तर आले आणि त्यातून हजारो लोकांचे प्राण वाचले होते. मात्र, दुसरीकडे कृतघ्न असलेले राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मात्र, नेहमी त्याच केंद्र सरकारला शिव्या देत होते. ''झूठ के पैर नहीं होते, उद्धव के लंगड़े झूठ की बैसाखी उसी के साथी ने छीन ली अब भी कुछ शर्म बाकी हो तो माफी मांगे उद्धव ठाकरे,'' असा टोला भाजपच्या उत्तर भारतीय मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. संजय पांडेय यांनी लगावला. मुंबई महापालिका आयुक्तांवरील 'इकबालसिंह चहल-कोविड वॉरियर' या पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. त्यावर संजय पांडेय यांनी प्रतिक्रिया दिली. मुंबईचे महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांनी कोरोनाकाळात केलेल्या कामाचा आढावा या पुस्तकाद्वारे घेण्यात आला आहे.

# संजय राऊतांच्या अडचणीत वाढ

## मेधा सोमय्या राऊतांविरोधात उद्या न्यायालयात



**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) :** शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी भाजप नेते किरीट सोमय्या आणि त्यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. याकारणाने संजय राऊतांविरोधात मानहानीचा दावा दाखल केला जाणार आहे. त्यामुळे संजय राऊतांच्या अडचणी वाढणार आहे.

राऊतांविरोधात सोमय्या कुटुंबीयांनी नुकतीच पोलिसांत धाव घेतली होती. कोणताही पुरावा नसताना राऊतांकडून बदनामीकारक वक्तव्य केली जात असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. पण अद्याप पोलिसांकडून त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

याविरोधात मेधा सोमय्या न्यायालयात धाव घेणार आहे. बुधवार, दि. १८ मे रोजी मुंबईतील शिवडी येथील न्यायालयात राऊतांविरोधात मानहानीचा दावा दाखल केला जाणार आहे. १०० कोटींच्या शौचालय घोटाळा केल्याचा राऊतांचा आरोप महिलेवर दबाव टाकण्यासाठी आहे. त्यांच्याकडे याचा एकही पुरावा नाही. त्यामुळे न्यायालयात जाणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले.

मेधा सोमय्या यांनी याबाबतचा तक्रार अर्ज मुलुंडमधील नवघर पोलीस ठाण्यात दिला आहे. त्यांच्यासोबत त्यांचा मुलगाही होता. राऊतांवर त्यांनी धमकावण्याचे आरोप केले आहेत. त्यांच्याविरोधात भादंवि 'कलम ५०३', '५०६' आणि '५०९'अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी अर्जात करण्यात आली आहे. राऊत यांनी माध्यमांमध्ये दुर्भाग्यपूर्ण आणि अयोग्य भाष्य केले आहे. त्यांनी केवळ आपले चारित्र्यहनन केले नाही, तर मला घाबरवले आणि धमकावलेही आहे, असे तक्रार अर्जात म्हटले आहे.

# पैसे दिले नाही, तर लेकरांना हाकलून देतात!

## महापालिका स्वच्छतागृहाची देखभाल करणाऱ्यांचा मनमानी कारभार

➤ गायत्री श्रीगोंदेकर ◀

**मुंबई, दि. १६ :** स्वच्छता गृहांची दुरुस्ती आणि देखभाल यासाठी मुंबई महापालिका दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र, मुंबईतील वस्त्यांमध्ये फिरताना मोडकळीस आलेले, सर्वत्र दुर्गंधी पसरलेली अस्वच्छ आणि गलिच्छ स्वच्छतागृहे पाहिली की हे कोट्यवधी रुपये पालिका कुठे खर्च करते, असा प्रश्न उपस्थित होतो. २,८०० लोकसंख्या असणारी मानखुर्दमधील प्रभाग क्र. १४६मधील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे वस्ती. मात्र, या वस्तीत केवळ तीन स्वच्छतागृहे आहेत. इतकेच नाही, तर पैसे नाही दिले म्हणून लहान मुलांना हाकलून दिले जात असल्याची व्यथा स्थानिक महिलांनी दै. 'मुंबई तरुण भारत'शी बोलताना मांडली.



लहान मुलांच्या आणि महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम सांगताना तेथील रहिवाशी महिला सांगतात की, ''दूषित पाण्यामुळे आमच्या अंगाला खाज येते. लहान मुलांना तिथे पाठवायला आम्हाला भीती वाटते. पैसे दिल्याशिवाय आम्हाला आता जाऊ देत नाही. आमच्या मुलांना हाकलून देतात. दररोजचे दोन रुपये द्यावे लागतात. पालिका कर्मचारी येऊन पाहत नाही, काहीच दखल घेत नाहीत. आम्हाला महिन्यांचे पासही दिले जात नाहीत. काही नळ तुटलेले आहेत, त्यातून पाणी येत नाही. स्वच्छतागृहे बंद करून ठेवतात. त्यामुळे आम्हाला बाहेर दूरवर जावे लागते. दुसरीकडे गेल्यावर तिथे गर्दुल्ले असतात. तो एक मानसिक त्रास सहन करावा लागतो. घरी नातेवाईक आल्यावर त्यांचीसुद्धा गैरसोय होते.''

मुंबई ग्राऊंडझिरो

वस्तीमधील स्वच्छतागृहांच्या अस्वच्छतेबाबत सांगताना तेथील स्थानिक महिला सुमन खंडावळे म्हणतात की, ''आम्हाला स्वच्छ पाणी मिळत नाही. पाण्यात जंतू असतात. आम्ही तक्रार करूनदेखील कोणी त्याचा पाठपुरावा करत नाही. आम्हाला शौचालयात जायचीदेखील घाण वाटते. दरवाजाला कडीसुद्धा नाही. सॅनिटायझरची सुविधा नाही.''

सामाजिक कार्यकर्त्या ज्योती साठे सांगतात की, ''१५ ते २० वर्षे झाली आम्ही इथे राहत आहोत. बाथरूमला गेल्यावर रांगेत उभे राहावे लागते. त्यामुळे कामावर जायला उशीर होतो. आम्हाला यासाठी रोज संघर्ष करावा लागतो. लोकसंख्या वाढतेय, गरजा वाढत आहेत. आमच्या समस्या आजाराशी निगडित होत आहेत. त्यामुळे आमची एवढीच मागणी आहे की, जे स्वच्छतागृह आहेत त्यांची व्यवस्थित स्वच्छता झाली पाहिजे आणि त्यांची संख्यादेखील वाढली पाहिजे. सद्य:परिस्थितीत ग्रामस्वच्छता मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येतेय, मग मुंबईमध्ये ही परिस्थिती का?''

सविस्तर व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
महा MTB www.mahamtb.com व्हिडिओ पाहा ▷

**Vinyl Chemicals (India) Limited**

CIN: L24100MH1986PLC039837

Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel: 2282 2708 Fax: 2204 3969 E-mail: cs.vinylchemicals@pidilite.com Website: www.vinylchemicals.com

**EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & YEAR ENDED 31.03.2022**

(₹ In lakhs)

| Particulars | For the Quarter ended | | For the Year ended | |
|---|---|---|---|---|
| | 31.3.2022 | 31.3.2021 | 31.3.2022 | 31.3.2021 |
| | Audited | Audited | Audited | Audited |
| Total Income | 12,405 | 16,688 | 86,753 | 40,552 |
| Profit/(loss) for the period before tax | 1,940 | 517 | 4,669 | 1,524 |
| profit/(loss) for the period after tax | 1,451 | 387 | 3,487 | 1,135 |
| Total Comprehensive Income for the period [comprising profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1,447 | 388 | 3,482 | 1,133 |
| Equity Share Capital (Face Value of share: ₹ 1) | 183 | 183 | 183 | 183 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | 9,419 | 6,625 |
| Earnings per share of ₹ 1 each in ₹: | | | | |
| Basic | 7.93 | 2.11 | 19.01 | 6.19 |
| Diluted | 7.93 | 2.11 | 19.01 | 6.19 |

**Notes:**
The above is an extract of the detailed Audited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Audited Financial Results are available on the websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company's website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 16th May, 2022

**M.B. PAREKH**
**Chairman & Managing Director**
(DIN: 00180955)